लोकआरंभ

# कृषी विज्ञान केंद्राच्या वतीने सावित्रीबाई फुले जयंती निमित्त महिला शेतकरी मेळावा साजरा

नांदेड प्रतिनिधी : बालाजी सिरसाट

नांदेड : कृषी विज्ञान केंद्र पोखर्णी नांदेड –१ च्या वतीने क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले जयंती निमित्ताने महिला शेतकरी मेळावा ३ जानेवारी २०२५ रोजी आयोजित करण्यात आला . त्यानिमित्ताने महिलांचे दिवसेंदिवस आहार आणि आरोग्याकडे दुर्लक्ष होत चालले आहे , हे लक्षात घेऊन महिला मार्गदर्शनासाठी अनुभवी आहारतज्ञ आणि डॉक्टर यांना प्राचारण केलं गेलं.कार्यक्रमाची सुरुवात क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले,राष्ट्रमाता राजम ाता जिजाऊ, देवी सरस्वती यांच्या प्रतिमा पूजनाने मान्यवरांच्या हस्ते आणि भा. कृ. अ. नु. प. गीताने करण्यात आली.स्वागत सम ारंभानंतर कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. महेश अंबोरे यांनी केले. त्यानंतर तज्ञ डॉ. सुरेखा



पवार निवघेकर यांनी आरोग्य शिबीर घेऊन महिलांशी चर्चा करून सल्ला व मार्गदर्शन केले. त्यात त्यांनी आरोग्याची काळजी किशोरवयीन अवस्थेपासून वृध्द अवस्था इथपर्यंत सर्व महिलांनी आरोग्याची कशी काळजी घ्यावी आणि महिलांच्या विविध आजारांचे कारणे यावर सविस्तर चर्चा करून मार्गदर्शन केले. त्यानंतर आहारतज्ञ सौ.उर्मिला जाधव यांनी देखील खाण्याच्या चुकीच्या सवयी, अन्न शिजवन्याच्या अयोग्य पद्धती, दिवसाची पूर्तता यावर सखोल अशे मार्गदर्शन महिलांना सादरीकरणातून करण्यात आले. सदरील कार्यक्रमासाठी महाविद्यालयीन विद्यार्थिनी व शेतकरी महिलांचा समावेश होता . विशेष महिलांसाठी ज्ञमूल्यवर्धित पाककला स्पर्धाआयोजित करण्यात आली होती त्यामध्ये महिलांनी विशेष सहभाग नोंदवला व विजेत्या स्पर्धकांना मान्यवरांच्या हस्ते बक्षीस वितरण करण्यात आले.अध्यक्षीय भाषणनंतर शेतकरी महिला आणि उपस्थित उद्योजिका यांचे मनोगत जाणून घेऊन प्रा. संदिप जायभाये यांनी कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन करून राष्ट्रगीताने सदरील कार्यक्रमाची सांगता करण्यात आली. सदरील कार्यक्रम कृषी विज्ञान केंद्राचे संचालक डॉ. एस. डी .मोरे आणि वरिष्ठ शास्त्रज्ञ व प्रमुख डॉ. देविकांत देशमुख यांच्या मार्गर्शनाखाली प्रा. सौ.अल्का पवळे पाटील यांनी आयोजित केला असून कार्यक्रमासाठी कृषी विज्ञान केंद्राचे शास्त्रज्ञ आणि कर्मचारी यांची विशेष उपस्थिति लाभली.असे बोलले जात आहे. बाहेरचे पालकमंत्री आल्यास त्याची पुनरावृत्ती आता सुद्धा होऊ शकते. पालकमंत्री हे प्रत्यक्ष जनतेची संपर्क साधण्याचे टाळतात यामुळे अनेकांचे कामे रखडली जातात. सर्वसामान्य पासून सगळ्यांनाच आपले काम करून घेण्यासाठी मध्यस्थी गाठावा लागता